जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक -३४० दिनांक - २७/०८/२०२४

भारती विद्यापीठ पोलिस स्टेशन पुणे शहर

**पायी चालणा-या महीलांचे गळयातील मंगळसुत्र चोरी करणा-या आरोपीस केले जेरबंद**

दिनांक २३/०८/२०२४ रोजी दुपारी ०३.१० वा ते ०३.२० वा चे सुमारास भास्कर महाडकी सनं २५/४ खेडेकर चाळ, महादेव मंदीराची समोरील लेन, आंबेगाव पठार, पुणे येथुन फिर्यादी हया पायी जात असताना पांढरे रंगाचे ॲक्टीव्हा दुचाकी गाडी वरील अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे गळयातील १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने ओढुन चोरी केले आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिले तक्रारीवरुन भारती विदयापीठ पोलीस स्टेशन,गुन्हा रजि नंबर ६८५/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम ३०९(४) अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील अनोळखी आरोपीचा शोध घेणेबाबत मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक डी.एस.पाटील यांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करुन सुचना दिल्या. त्यानुसार तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार मितेश चोरमोले,अभिनय चौधरी,सागर बोरगे,अवधुत जमदाडे यांनी तांत्रिक विश्लेषनाव्दारे पांढरे रंगाचे ॲक्टीव्हा दुचाकी गाडीवर एक संशयीत इसम दिसुन आला. त्या संशयीत इसमाचा शोध घेत असताना वर नमुद अंमलदार यांना आरोपी नामे **समर्थ राजु कोंथीबिरे,वय २६ वर्षे,रा.निवृत्तीनगर,वडगाव बु,पुणे मुळ सोलापुर** हा गुन्हयात वापरलेल्या दुचाकी गाडीवर लेकटाऊन भागात दिसुन आला.लागलीच त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करुन त्याचा नमुद गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक केले आहे. अटके दरम्यान आरोपीकडे तपास करता त्याने आणखीन सोन्याचा लक्ष्मीहार व दुचाकी गाडी चोरी केल्याचे कबुली दिली असुन त्याचेकडुन २,२५,०००/-रुपये किंमतीचे ३२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व हार जप्त,तसेच दुचाकी गाडी जप्त केली आहे. आरोपीकडुन असे एकुण ३ गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्रीमती नंदीनी वग्याणी, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी,पोलीस अंमलदार मितेश चोरमाले,अवधुत जमदाडे,सागर बोरगे,अभिनय चौधरी,सचिन सरपाले,शैलेश साठे, नामदेव रेणुसे,महेश बारवकर,चेतन गोरे,निलेश जमदाडे,हनमंत मासाळ, निलेश ढमढेरे,मंगेश पवार, सतिश मोरे,निलेश खैरमोडे,धनाजी धोत्रे,सचिन गाडे,विनोद कांबळे यांच्या पथकाने केली आहे.


भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर
पुणे पोलीस
HONDA
MH12UG6618